दै. पुण्यनगरी. दि. ३०।०१।२५

# ६ हजारांच्या दारुसह दुचाकी जप्त

**कुंडलवाडी / प्रतिनिधी**

कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुंडलवाडी ते पिंपळगाव जाणाऱ्या रस्त्यावर दारुची अवैध वाहतूक होत असल्याचे कळाल्यावर पोलिसांनी दुचाकीसह ६ हजारांची दारु जप्त केली आहे.



कुंडलवाडी ते पिंपळगाव जाणाऱ्या रस्त्यावर दि.२८ जानेवारी रोजी रात्री ९:३० वाजेच्या सुमारास दारुची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसंना मिळाली. त्यावरुन कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोहेकॉं शंकर चव्हाण,पोहेकॉं अरुणा श्रीवास्तव व रवि देशमुख यांनी पिंपळगाव रस्त्यावर संशयित दुचाकी रोखली. या दुचाकीचा क्रमांक एम एच २६ सी एस ०३९८ असा आहे. दुचाकी चालक राजशेखर गोपाल गौड निम्माला पकडण्यात आले आहे. त्याच्याकडून ६ हजार ७२० रुपयांची देशी दारू भिंगरी संत्राच्या ९६ बाटल्या व ७० हजार रुपये किमतीची दुचाकी असा एकूण ७६ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. राजशेखरविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुरनं ९/२०२५ दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉं शंकर चव्हाण करीत आहेत.

# मरखेल पोलिसांकडून अवैध दारूचा साठा जप्त



दै. प्रजावाणी

**देगलूर :** बेकायदा देशी-विदेशी दारू बाळगल्या प्रकरणी मरखेल पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून १७६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दोघांवर बुधवार दि. २९ जानेवारी रोजी कारवाई करण्यात आली. देगलूर तालुक्यातील मरखेल पोलीस ठाणेअंतर्गत लोणी ते हाणेगाव जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला एका टिन शेड हॉटेलमध्ये धोंडूबाई मशनरी केसवे या महिलेने विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी दारू भिंगरी संत्राच्या १८० एम एल क्षमतेच्या १९२ काचेच्या सीलबंद बॉटल किंमत १३४४० रुपयांचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्या प्रकरणी उपरोक्त महिला आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला. तर दुसऱ्या घटनेत उपरोक्त घटनेची पुनरावृत्ती करीत लिंगूराम यादव गुडलिंगू रा. लोणी याने देशी दारू भिंगरी संत्राचे १७ बॉटल किंमत ११९० रुपये व एम सी मॅकडॉल नंबर वन च्या १९ बॉटल किंमत ३ ०४० असे एकूण ४२३० रुपयांचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्या प्रकरणी मरखेल पोलिसांनी उपरोक्त दोन्ही आरोपीकडून १७६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.